# 8 डिसेंबर

**आजचा सुविचार :**

“तुम्ही पाण्याच्या लाटा पाहत किनाऱ्यावर बसून समुद्र पार करू शकत नाही.”

**आजचे पंचांग :**

वार – बुधवार दिनांक: 8 डिसेंबर 2021
तिथी – मार्गशीर्ष नक्षत्र – श्रवण
सूर्योदय – सकाळी 7.02वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 5. 59वाजता

**आजचे दिनविशेष :**

- 1967 ला आयएनएस कलवारी भारतीय नौदलात समाविष्ट करण्यात आले.
- 1875 ला भारताचे स्वातंत्र्य सैनिक तेज बहादुर सप्रू यांचा जन्म.
- 1901 ला भारताच्या संसद चे सदस्य अमरनाथ विद्यालंकार यांचा जन्म.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Sunflower – सूर्यफुल 2) Lotus - कमळ
3) Jasmin – जाई 4) Marigold- झेंडू

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) चार मांसाहारी प्राण्यांची नावे सांगा. 2) आपल्या कर्नाटकचे सध्याचे मुख्यमंत्री कोण आहेत.
3) 200 + 213 = ? 4) त्रिकोणाच्या तीन कोनांची बेरीज किती असते?
5) पृथ्वीला सर्वात जवळचा तारा कोणता?

**बोधकथा :**

## पर्वत आणि उंदीर

एकदा एक पर्वत आणि उंदीर यांच्यात वाद सुरू होता. 'श्रेष्ठ कोण?' यावर ते भांडत होते.
पर्वत म्हणाला, "तू किती छोटा प्राणी आहेस, तू माझ्याहून अजिबात श्रेष्ठ नाहीस."
उंदीर पटकन म्हणाला, "मला माहित आहे की, मी तुझ्या एवढा मोठा नाही. पण तू तरी कुठे माझ्या एवढा लहान आहेस!"
पर्वत म्हणाला, "मोठ्या आकाराचे अनेक फायदे असतात. मी मोठा असल्याने आकाशात वाहणाऱ्या ढगांना अडकवू शकतो."
उंदीर म्हणाला, "तू त्या ढगांना अडवू शकतोस. पण तुझ्या पायथ्याशी मी मोठी बिळे करतो. तेव्हा तू मला अडवू शकतोस का?"
छोट्या उंदराने आपल्या चतुराईने पर्वतावर मात केली व तो आपल्या बिळात घुसला.

**तात्पर्य:** छोटा असो की मोठा, प्रत्येकाला स्वत:चे महत्त्व असतेच.